महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

# संचालनालय, लेखा व कोषागारे

मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, ३ रा मजला,
जे रेडियाहे.एन.मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०२९/३६, मेल-ई-aaoadmindat.mu-mh@gov.in

क्र.संलेको/ प्रशा राप /.कार्या6 /प्रशा बदली सन2020/ 451

दि. 8 JUL 2020

संदर्भः- १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१७/कार्यासन १२, दिनांक.९.४.२०१८.

२. शासन वित्त विभाग, परिपत्रक क्र.संलेको २०१८/प्र.क.३५/कोषा प्रशा-२, दिनांक २०.०४.२०१८.

३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.३०/कार्यासन १२, दिनांक ०७.७.२०२०

## //परिपत्रक//

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतुदीनुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गामधील अधिका-यांच्या बदल्या माहे जुलै-२०२० मध्ये करण्याचे प्रस्तावित आहे.

१. सध्याच्या कार्यरत पदावर ज्या अधिका-यांना किमान तीन व त्यापेक्षा जास्त वर्षाचा कालावधी झाला आहे (३१ मे २०१७ व त्यापूर्वीचे आदेश व दि. ३०जून २०१७ पर्यंत रुजू झालेल्या लेखा अधिकारी संवर्गातील अधिका-यांची यादी व लेखा अधिकारी संवर्गातील रिक्त पदांची यादी (अवघड/बिगरअवघड क्षेत्रनिहाय) अनुक्रमे परिशिष्ट **"अ"** व **"ब"** मध्ये प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. सोबतच्या विहित नमुन्यात बदलीसाठीचे १० पसंतीक्रम दिनांक १७.०७.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत संचालनालयात aaoadmindat.mu-mh@gov.in या ई मेल वर PDF नमुन्यात स्वाक्षरीत अर्ज व **सहपत्रासह** पाठवावेत. एकदा दिलेला विकल्प हा अंतिम राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

३. संचालनालयास दिनांक ०९.०७.२०२० ते १७.०७.२०२० या कालावधीत प्राप्त झालेला फक्त पहिला अर्जच बदलीसाठी ग्राह्य धरला जाईल. एकाच अधिका-यांचे एकापेक्षा जास्त आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी

४. ज्या लेखा अधिका-यांचे पसंतीक्रम प्राप्त होणार नाहीत, त्यांना दि.०९.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रशासकीय सोयीनुसार पदस्थापना देण्यात येईल. तसेच अशा अधिकाऱ्यांच्या बदलीच्या पदस्थापनेत अंशतः बदलीकरीताचा अर्ज देखिल विचारात घेतला जाणार नाही.

**५. पसंतीक्रम देताना पुढील बाबी विचारात घ्याव्यात :-**

- **पसंतीक्रम देताना बदलीपात्र लेखा अधिकाऱ्यांनी शासन निर्णय दिनांक ०९.०४.२०१८ व शासन वित्त विभाग परिपत्रक दि.२०.०४.२०१८ मधील तरतुदींचा संपूर्ण अभ्यास करुन पसंतीक्रम द्यावा.**

- **संबंधितांनी पसंतीक्रम देताना संचालनालयाने प्रसिध्द केलेली लेखा अधिकारी संवर्गाची रिक्त पदांची यादी व बदलीपात्र अधिकाऱ्यांच्या यादीमधीलच कार्यालये विचारात घ्यावीत. सदर दोन याद्यांबाहेरील कार्यालयांची पसंती विचारात घेतली जाणार नाही.**
- **ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या कार्यरत जिल्हयात दोन पदावधी पुर्ण झाले आहेत, त्यांना जिल्हाबदल करुन पदस्थापना द्यावयाची आहे.** यास्तव अशा अधिकाऱ्यांनी पसंतीक्रम सादर करताना सदर बाबींची नोंद घेऊन बदलीसाठी त्यांच्या पसंतीच्या जिल्हयातील कार्यालयांचे पसंतीक्रम सादर करावेत. तसे न केल्यास प्रशासकीय निकडीनुसार त्यांचा जिल्हाबदल करुन पदस्थापना देण्यात येईल.
- जे अधिकारी प्राधान्यक्रमात येत असतील त्यांना त्या पृष्ठयर्थ संबंधित कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक राहील.

६. संदर्भीय शासन निर्णयाद्वारे **सर्वसाधारण बदल्याव्यतिरिक्त काही अपवादात्मक परिस्थितीमुळे किंवा विशेष कारणामुळे बदल्या करावयाच्या असल्यास, अशा बदल्या देखील दि. ३१ जुलै २०२० पर्यंत बदली अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन करावयाच्या असल्यामुळे असे स्वाक्षरीकेलेले विनंती अर्ज आणि आवश्यक सहपत्रे यासह** दिनांक १५.०७.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत संचालनालयात aaoadmindat.mu-mh@gov.in या ई मेल वर PDF नमुन्यात पाठवावेत.

७. सन २०१९ मध्ये बदली आदेश निर्गमित झाले असूनही अद्याप पर्यंत बदलीच्या पदावर रुजू न झालेल्या अधिका-यांनी तात्काळ संचालनालयास याबाबतची वस्तुस्थिती कळवावी.

८. ई मेल द्वारे पाठविण्यात आलेल्या अर्ज व सहपत्रांची मुळ प्रत संचालनालयास टपालाने पाठविण्यात यावी.

९. शासन निर्णय दि. ०९.०४.२०१८ मधील नमूद सामान्य प्रशासन विभागाच्या तरतूदीनुसार अधिकाऱ्यांनी त्यांच्या सेवाविषयक बाबीसंबंधीच्या तक्रारीचे निवारण आणि वैयक्तिक कामे करुन घेण्यासाठी खासदार,आमदार,राजकीय संघटनांचे कार्यकर्ते आणि इतर अशासकीय व्यक्ती यांच्यामाफत त्यांची गाऱ्हाणी मा. मंत्र्यांकडे नेऊ नयेत आणि तसे केल्याचे आढळून आल्यास ते शिस्तभंग कारवाईस पात्र ठरतील. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी याची नोंद घ्यावी.

**(ज. र. मेनन)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**